# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र.०७१२–६४६५१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३


**कार्यालयीन आदेश (०४)**

क्रमांक :– तंशिस/विकाना/शैशुप्रतिपूर्ति/१७–१८/२०१८/3087

दिनांक :– 18/09/2018

**विषय**– खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती (ई.बी.सी) शैक्षणिक सत्र २०१७–१८.

**संदर्भ**– (१) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र. संकिर्ण–२०१८/प्र.क्र.२०८/तांशि–४, दि. २१/०६/२०१८.

(२) मा.संचालक, तंत्रशिक्षण,म.रा. मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र १८/अर्थसं/ईबीसी/वितरण//२०१७–१८/२५८, दि. १०/०७/२०१८.

वरील संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर हे त्यांचे अधिपत्याखालील निम्नदर्शित खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी /पदव्युत्तर पदवी व पदविका संस्थांमधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय ( EBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या **शैक्षणिक शुल्क (Tuition Fees) च्या ५० टक्के** एवढी रक्कम निम्नदर्शित विवरणाप्रमाणे *शैक्षणिक सत्र २०१७–१८ करीता वाटप करण्यांबाबत मंजूरी देण्यांत येत आहे.*

| Sr. No. | Instt Code No. | Institute Name | Total No. of Candidates | Total 50% Tution Fee To Be Reimbursed |
|---|---|---|---|---|
| 01 | 4116 | G.H.Raisoni College of Engg. Nagpur | 91 | 45,25,612 |
| | | **Total Amount** | 91 | 45,25,612/- |

*( रुपये पंचेचाळीस लाख पंचवीस हजार सहाशे बारा फक्त )*

उपरोक्त संस्था प्रमुखांनी खालील बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

१. शैक्षणिक सत्र २०१३–१४ पासून ईबीसी प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने राबविण्यांत येत असल्यामुळे ज्या संस्थेच्या DTE Code अंतर्गत अभियांत्रिकी पदवी, एमबीए, एमसीए किंवा अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रम असतील त्यांची सर्व अभ्यासक्रमाची रक्कम एकत्र देण्यात आली आहे याची नोंद घ्यावी.

२. शैक्षणिक सत्र २०१७–१८ साठी आपले कार्यालयाव्दारे या कार्यालयास सादर केलेल्या ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांनी २०१७–१८ या शैक्षणिक सत्रात ई.बी.सी. या सवलती व्यतिरिक्त शासनाच्या इतर अन्य कोणत्याही सवलतीचा प्रत्यक्ष लाभ घेतलेला नाही अथवा मंजूर झाला नाही. अशा आशयाचे, तसेच मंजुर झालेल्या ई.बी.सी. रकमेचे अतिप्रदान झाल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास, झालेल्या अतिप्रदानाची एका हफ्यात वसुली भरण्यांत येईल असे प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी प्रमाणपत्र/हमीपत्र सादर करावे. त्याबाबतचा नमुना या कार्यालयाच्या संकेतस्थवर (www.rdtenagpur.org.in )डाऊनलोड लिंकवर ०७/०५/२०१३ दिनांकास उपलब्ध आहे

३. संबंधीत संस्था प्रमुखांनी वरील क्र. २ मधील बाबींची पुर्तता केली असल्यास त्यांना ई.सी.एस. / एन.ई.एफ टी. व्दारे मंजूर रक्कम वितरीत करण्यांत येईल. त्याकरीता संस्थेने त्यांच्या संस्थेच्या बँक खात्याबाबतची माहिती करीता आपल्या संस्थेचा चेकची छायांकित प्रत प्राचार्याव्दारे साक्षांकित करुन व प्रपत्र 'अ' मध्ये बँक खात्याची

**माहिती तात्काळ सादर करावी. त्याशिवाय आपल्या संस्थेची रक्कम आपणास अदा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

४. शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मधील परिक्षा शुल्काची रक्कम विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यापीठे/मंडळे यांच्याकडे जमा केली असल्यानं शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यांत येणा–या परीक्षा शुल्काची रक्कम संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावी.

५. ई.सी.एस. / एन.ई.एफ टी. व्दारे मंजूर रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधीत लाभार्थी विद्यार्थ्यांना ई.सी.एस. / एन.ई.एफ टी. व्दारे थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम मिळाल्याच्या १५ दिवसाच्या आत जमा करण्यात यावी व त्याबाबतचा फी प्रतिपुर्तीचा लाभ मिळाल्याचे संबंधित विद्यार्थ्यांचे पावती / प्रमाणपत्र घ्यावे. ईबीसी मंजूरी झाल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याची ईबीसी , परीक्षा शुल्काची रक्कम मिळाली नसल्याची तक्रार या कार्यालयास प्राप्त होता कामा नये.

६. तद्नंतर प्राप्त निधीचा उपयोग प्रस्तावित कारणांसाठीच करण्यांत आला असे उपयोगिता प्रमाणपत्र व लाभार्थी विद्यार्थ्यांचे वाटप विवरणपत्र (मुद्रांक पावत्यांसह) मंजूर रक्कम मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आंत या कार्यालयास सादर करावे. अन्यथा एकुण देय रक्कमेच्या प्रतिदिनी १ टक्के प्रमाणे दंड वसूल करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत – १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्र. १५) यांना माहितीकरीता

२. वरील संबंधीत सर्व संस्था प्रमुख, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना.त्यांना असे कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांची ऑनलाईन यादी त्यांच्या लॉगीनमधून काढून घ्यावी व त्यानुसार त्यांना वितरीत करावी.सदर रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यामध्ये ई.सी.एस. /एन.ई.एफ.टी. व्दारे जमा करुन उपयोगिता प्रमाणपत्र व अहवाल या कार्यालयास रक्कम मिळाल्याच्या १५ दिवसाच्या आत सादर करावा.

३. अधिक्षक, शैक्षणिक विभाग, हेच कार्यालय यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

४. रोखपाल, हेच कार्यालय, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी त्यांना कळविण्यात येते की, वर्ष २०१७–१८करीता ई.बीसी. साठी उपलब्ध असलेल्या अनुदाना मधुन वरीलप्रमाणे रक्कम सदर संस्थेच्या बँक खात्यात ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. व्दारे जमा करण्यात यावी.